मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

दूरध्वनी क्र.०२२- २२८८०३११
मेल आयडी-
nilima.chaudhary@nic.in

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

---

**क्रमांक- आस्था-२०२५/प्र.क्र.३२/का-१.** दिनांक : ०२ मे, २०२५.

प्रति,

अवर सचिव,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई-३२,

**विषय :-** निर्लेखित केलेल्या वाहनांची लिलावाबाबतची निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत

**संदर्भ :-** वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. डीएफपी-१०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम, दि.२२.०६.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयानुसार संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनांच्या लिलावाबाबतची निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार या विभागाच्या अधिनिस्त असलेल्या वाहन क्र.एमएच-०१ एएन-१००२ (MARUTI SUZUKI) आणि क्र.एमएच-०१ एएन-५५ (ॲम्बेसिडर) या निर्लेखित वाहनांच्या निविदा सूचना, अटी व शर्तींची छायांकित प्रत या सोबत जोडली असून, सदर जाहिरात ही दि.०५.०५.२०२५ पासून दि.०९.०५.२०२५ या कालावधीकरिता महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(नीलिमा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत:-** निविदा सूचना

# शासकीय वाहन निविदा सूचना

शासन ज्ञापन क्रमांक शासन ज्ञापन क्रमांक क्र. आस्था-२०२५/ प्र.क्र.३२/का-१, दि.०३.०४.२०२५ अन्वये वाहन क्र.एमएच-०१ एएन १००२ (MARUTI SUZUKI)व शासन ज्ञापन क्र.आस्था-२००९/प्र.क्र.२२३/ का-१, दि.२७.०५.२०१९ अन्वये वाहन क्र.एमएच-०१ एएन ५५ (ॲम्बेसेडर) ही वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. त्यामुळे सदरची वाहने आहे त्या परिस्थितीत विक्री करावयाची आहेत. त्यासाठी सदर वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था ज्या किंमतीला वाहन खरेदी करू इच्छितात त्या किंमतीच्या मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | गाडीचा प्रकार/गाडीचा क्रमांक | वाहन निरीक्षणासाठी उपलब्ध असलेचे ठिकाण व वेळ | मोहोरबंद निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख व ठिकाण | मोहोदबंद निविदा उघडणेची तारीख वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | क्र.एमएच-०१ एएन १००२ ( MARUTI SUZUKI ) | मंत्रालय, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | दिनांक ०९.०५.२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत (सायं.०६.१५ मि.) कक्ष अधिकारी (आस्थापना), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | दिनांक १३.०५.२०२५ वेळ दुपारी ०३.०० वाजता उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दालन |
| ३. | एमएच-०१ एएन-५५ ( ॲम्बेसेडर ) | शासकीय परिवहन सेवा कार्यालय इमारत, वरळी, मुंबई | | |

वाहने निरीक्षणासाठी व तापसणीसाठी स्तंभ क्र.३ मध्ये नमुद ठिकाणी ठेवण्यात आली आहेत.

१. सदर वाहने खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीस व संस्थेस वाहने जेथे जसे आहे तशाच स्थितीत या तत्त्वावर घ्यावी लागतील.

२. वाहनांचे निरीक्षण करू इच्छिणाऱ्या संबधित व्यक्ती /संस्थेने कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग यांचेकडे संपर्क करून वाहनाचे निरीक्षण करावे.

३. वाहनासाठी निविदा भरून सादर करावी.

४. इसाऱ्याची रक्कम रु.२०००/- (प्रत्येक निविदेस) धनाकर्षाद्वारे रोख शाखा, महिला व बाल विकास विभाग यांचे कार्यालयात जमा करावेत. धनाकर्ष कक्ष अधिकारी, रोख शाखा, महिला व बाल विकास विभाग यांच्या नावाने काढावा.

५. इसाऱ्याची रक्कम भरणा केलेल्या धनाकर्षाची पोचपावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

६. निविदा उघडण्याकरिता निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

७. यशस्वी निविदा धारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरून एक आठवड्यात वाहनाचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस मुकावे लागेल.

८. विक्री अधिनियमानुसार यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो विक्रीकर भरावा लागेल. वाहनांचा (आरटीओ कार्यालयातील) कर व वाहनांचा विमा तसेच विक्रीकर भरल्याचा पुरावा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी सादर करावा लागेल. तसेच वाहनासंबधीत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता निविदाधारकास करावी लागेल.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटी करारांची पूर्तता करू शकत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निविदा रद्द करून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. मोहोरबंद निविदा पाठविताना पाकीटावर संबंधित वाहनाचा क्रमांक स्पष्टपणे लिहिलेला असावा.

११. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार उप सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी राखून ठेवले आहेत.

(नीलिमा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन